**नि.फौ. प्र. क.४८/२०१७**
**दिलीप वि. दिपाली**

**पडताळणी**

**शपथेवर निवेदन करतो की,**

माझे नाव : दिलीप राजेराम पारधी
वय : ३५. वर्षे, व्यवसाय- शेती
राहणार : चौधान ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

माझी पत्नी दिपाली लग्नानंतर माझेसोबत ८-१० दिवस राहली. ती आखाडी सणानिमित्त माहेरी गेली आणि त्यानंतर दोन दिवसांनी ती आली. त्यानंतर ती दिवाळीला माहेरी गेली. मी तिला आणण्यासाठी माधवराव पारधीसोबत गेलो. ती आमच्यासोबत आली नाही. त्यामुळे मी वकीलामार्फत तिला नोटीस पाठविली आणि तिला नांदविण्यासाठी चंद्रपूर येथील न्यायालयात तिच्याविरुध्द केस दाखल केली. ती न्यायालयातसुध्दा आली नाही. मला नंतर माहिती मिळाली की, तिने किशोर राउत नावाच्या व्यक्तीसोबत लग्न केले. पंजाब ठेंगरे, बेबी ठेंगरे, अभय, योगेश व अजाबराव यांनी या लग्नामध्ये मदत केली. मी पोलिसांकडे माझे पत्नीने केलेल्या दुस-या लग्नाबद्दल तक्रार केली. पोलिसांनी मला अदखलपात्र गुन्हा असल्याची समज दिली. करिता मी न्यायप्राप्तीसाठी मी हे प्रकरण दाखल केले. आरोपींना या गुन्हयाबद्दल शिक्षा करण्यात आली.

साक्षदाराला बयान वाचुन दाखविले. त्याने ते बयान बरोबर असल्याचे सांगितले.
साक्षीदाराची सही

माझे समक्ष

रामटेक.
दिनांक : १७/०८/२०१७

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक

**नि.रफौकृमा..क.१२०/२०१६**
**मे.युनायटेड इंडस्ट्रीअल सेक्युरीटी वि. मे. त्रिमुर्ती कमर्शिअल्स व इतर**

## पडताळणी

**शपथेवर निवेदन करतो की,**

माझे नाव : संदिप नत्थूजी ठाकरे
वय : ३६. वर्षे, व्यवसाय- सुरक्षा रक्षक
राहणार : भंडारबोडी ता. रामटेक जि. नागपूर

मी युनायटेड सेक्युरीटीमध्ये सुरक्षारक्षक म्हणून काम करतो. दिनांक ०६.१०.२०१६ पासून मी त्रिमुर्ती कमर्शिअल प्रा. लि. भंडारबोडी येथील माईन्सवर सुरक्षा रक्षक म्हणून काम करतो. दिनांक १९.१०.२०१६ रोजी रात्री ९.३० चे दरम्यान त्रिमुर्ती कमर्शिअल माईन्समध्ये ४० ते ५० इसम ४ टिप्पर, फोकलॅन मशिन आणि जेसीपी सह माईन्समध्ये घुसले. ते जोरजबरदस्तीने खोदकाम करीत होते. त्यांनी मला धमकी दिली. मी त्यांना खोदकामापासून रोखले. म्हणून त्यांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली. माझेसोबत मंगेश पिल्हारे आणि जगदिश ठाकरे हे होते. मी ढवळे साहेबांना याबद्दल सांगितले. ढवळे साहेब २० तारखेला आले. त्रिमुर्ती कमर्शिअलच्या माणसांनी त्यांना धमकी दिली. मी ढवळे साहेबांसोबत रामटेक पोलिस स्टेशनला आलो.

मला बयान वाचुन समजुन सांगितले हे बयान बरोबर आहे.

साक्षीदाराची सही

माझे समक्ष

रामटेक.
दिनांक : १९/११/२०१६.

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक

**दस्तऐवज शाबीतीकरीता सरतपास शपथेवर पुढे सुरु**

मी या दाव्यामध्ये वाद नकाशाची प्रत नि.क्र.१६० नुसार दाखल केले.

**उलटतपास** वादी तर्फे ॲड. श्री देवळे

वकीलांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्या.क. स्तर, रामटेक
दिनांक : २४/१०/२०१६

(सुजीतकुमार चं. तायडे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रामटेक

**उलटतपास आज दिनांक १५.११.२०१६ रोजी शपथेवर सुरु – वादीतर्फे श्री देवळे, अधिवक्ता**

दिनांक ०८ फेब्रुवारी २०१६ पासून मी नगरपरिषद, रामटेकची मुख्याधिकारी आहे. मी दाव्यातील दस्ताऐवज पाहिले आहे. सन २००० नगरपरिषदेचे मुख्याधीकारी कोण होते हे मला माहित नाही. तत्कालीन मुख्याधिकारी यांना माझेसमक्ष सही करण्याचे कधीही काम पडले नाही. नावावरुन मी त्यांची सही ओळखते असे माझे म्हणणे आहे.

हे म्हणणे खरे आहे की, २००२ मध्ये गांधीचौक ते शांतीनाथ मंदिर दरम्यानचे रोडचे रुंदिकरणाचे काम झाले. वादी यांचे गांधीचौकातील दुकान मी पाहिले नाही. दस्ताऐवजावरुन वादीचे दुकान पुर्वमुखी आहे असे मला समजले. वादीच्या दुकानापुढे रस्ता आहे आणि त्यानंतर गांधीचौकाचा कठघरा व पुतळा आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या दुकानाच्या समोर पुर्व दिशेला एक जुनी सरकारी नाली भुमीगत आहे. मी दिनांक ०३.०२.२०१० चा वादजागेचा दुरुस्त झालेला सिटीसर्व्हेचा रेकॉर्ड पाहिलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, सध्याच्या सिटीसर्व्हे दुरुस्ती अभिलेखानुसार वादीचे

कोणत्याही जागेवर अतिक्रमण नाही. हि दुरुस्ती झाल्यानंतर नगरपरिषदव्दारे वादीच्या जागेची पडताळणी करण्यात आली नाही. वादीच्या शेजा-यांनी वादीने केलेल्या अतिक्रमणाबाबत नगरपरिषदेला तक्रार केली होती. साक्षीदार स्वत: सांगते की, माजी आमदार पांडूरंग हजारे यांनी या संबंधाने तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६.१२.१९९९ रोजी वादीच्या जागेलगत असलेल्या नेटीव्ह क्लबच्या अध्यक्षांनी वादीच्या बांधकामाबाबत त्यांना कोणताही आक्षेप नसल्याचा अर्ज नगरपरिषदेला दिला होता. वादजागेला लागुन पश्चिम दिशेला लागुन नेटीव्ह क्लबची जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे बांधकाम सन १९९२ मध्ये पुर्ण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, माजी आमदार हजारे यांनी वादीच्या बांधकामाविरोधात खोटी तक्रार केली व त्यामुळे त्याच्या प्रभावाखाली नगरपरिषदेने वादीवर कारवाई केली. हे म्हणणे खरे आहे की, वाद जागेलगत असलेल्या नेटीव्ह क्लबच्या जागेचे (सर्व्हे क्र. २०८४) चे मालक पांडुरग हजारे नाही व त्यामुळे वादजागेच्या बांधकामाशी त्यांचा कोणताही संबंध नव्हता. नगरपरिषद हि अतिक्रमण करुन केलेल्या बांधकामाविरुध्द कारवाई करते. हे म्हणणे खरे नाही की, नगरपरिषदेने वादजागेच्या ३ फुट रुंदिच्या सज्ज्यापैकी दिड फुट रुंदिचा सज्जा अतिक्रमण होते म्हणून पाडला. साक्षीदार सांगते की, पांच फुटापैकी दिड फुट रुंदिचा सज्जा पाडला. गांधीचौकातील दुकाच्या ओळीमधील एक दुकान वादीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, या ओळीतील सर्व दुकानांची पश्चिमेकडील मागिल बाजू एकाच ओळीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या दुकाना व्यतिरिक्त आजुबाजूला असलेल्या त्या ओळीतील कोणत्याही दुकानाच्या बांधकामाबद्द कारवाई केली नाही. मला हे माहित नाही की, वादीच्या दुकानाला टिनाचे पत्रे लावले होती व त्या टिनावरुन पुर्व पश्चिम दिशेला पावसाचे पाणी पडत होते. हे मला माहित नाही की, त्या टिनाची ओलती ३ फुट होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या बांधकामाचा सज्जा या ओलतीच्या आंत होता. हे म्हणणे खरे नाही की, या जागेचा सरकारी जागेशी कोणताही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, रेकॉर्डप्रमाणे वादीचे दुकान व पश्चिमेकडी सिटीएस क्र. २०८४ यामध्ये कोणतीही गल्ली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे बांधकाम बेकायदेशीर नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटीसर्व्हे रेकॉर्डमध्ये दुरुस्ती झाल्यामुळे वादीच्या जागेत वाढ झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९२ मध्ये वादीने वादजागेच्या सज्ज्याचे बांधकाम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सज्ज्या १९९९ मध्ये पाडला. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९२ मध्ये वादीच्या बांधकामाबद्दल कोणाचीही तक्रार नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९२ मध्ये वादीला बांधकामाबाद्दल नोटीस देण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, नगरपरिषदेव्दारे बेकायदेशीररित्या वादीचा सज्ज्या पाडण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही

की, हजारेंच्या दबावाखाली या प्रकरणातील दुरुस्त रेकॉर्डच्या तथ्याची चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद सज्ज्या २० फुट लांब आणि ३ फुट रुंद आहे. सध्या नगरपरिषदेला वादीच्या या सज्ज्याबद्दल कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे बांधकाम हे मंजूरीनुसार करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली आहे.

**फेरतपास – काही नाही**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीकृत | समक्ष |
| (सुजीतकुमार चं. तायडे)<br>दिवाणी न्या.प्र.श्रेणी,<br>रामटेक.<br>दिनांक : १५/११/२०१६ | (सुजीतकुमार चं. तायडे)<br>दिवाणी न्यायाधीश क. स्तर,<br>रामटक |